**Publication:** Prahar
**Date:** 27/10/2015
**Edition:** Mumbai
**Page No:** 9
**Headline:**R.N. Podar School wins TCS IT WIZ

# ‘टीसीएस आयटी विझ’च्या फेरीत आर.एन. पोद्दार स्कूलची बाजी

**मुंबई :** देशातील सर्वात मोठ्या आंतरशालेय प्रश्नमंजूषा स्पर्धा असलेल्या टीसीएस आयटी विझच्या मुंबईत पार पडलेल्या स्पर्धेत शहरातील सुमारे ७०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. बांद्रा रिक्लेमेशनमधील इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या माणिक सभागृहात ही स्पर्धा पार पडली. या प्रादेशिक अंतिम फेरीतील प्रश्नावलीच्या पाच फेऱ्या पूर्ण केल्यानंतर पोद्दार स्कूलचे अभिषेक मुठांगे आणि निखिल कुमार हे विजेते ठरले. या फेरीतील विजेत्यांना आयपॅड एअरचे, तर उपविजेते राजहंस विद्यालयाच्या अवी सेठ आणि यश शर्मा यांना आयपॅड मिनी हे बक्षीस देण्यात आले.